महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती


# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : ११७ वे | दिनांक : २२/०४/२०२६ | वार बुधवार

# १९६७ नंतर पहिल्यांदाच शरद पवार मतदानापासून वंचित



**मुंबई** : बारामती विधानसभेच्या पोटनिवडणुकीच्या निमित्ताने एक ऐतिहासिक आणि भावूक घडामोड समोर आली आहे. 1967 मध्ये लढवलेल्या पहिल्या निवडणुकीपासून आतापर्यंत कधीही आपला मतदानाचा हक्क न चुकवणाऱ्या शरद पवार यांना यंदा प्रकृती अस्वास्थ्यामुळे मतदानापासून दूर राहावे लागणार आहे. ही माहिती स्वतः शरद पवार यांनी सोशल मीडियाद्वारे दिली असून, त्यांनी बारामतीकरांना सुनेत्रा अजित पवार यांना मतदान करून स्व. अजित पवार यांना श्रद्धांजली वाहण्याचे आवाहन केले आहे.

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे बारामती विधानसभेच जागा रिक्त झाली होती. या जागेवर पोटनिवडणूक होत असून, सुनेत्रा पवार महायुतीकडून निवडणूक लढवत आहेत. बारामती विधानसभेच्या पोटनिवडणुकीच्या प्रचाराचा आज शेवटचा दिवस होता. त्यामुळे बारामतीत आज सुनेत्रा पवारांसाठी भव्य सांगता सभा पार पडली. या सभेला महायुतीतील तिन्ही पक्षांतील प्रमुख नेत्यांसह शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनीही हजेरी लावली होती. शरद पवार मात्र प्रकृती ठीक नसल्याने ते प्रचार सभेला येऊ शकले नाही. त्यातच आता आपण पोटनिवडणुकीत मतदान करू शकणार नसल्याचे त्यांनी सोशल मीडियावर पोस्ट करून सांगितले.

शरद पवार म्हणाले, मी 1967 मध्ये लढविलेल्या पहिल्या निवडणुकीपासून बारामती मतदारसंघातील माझ्या मतदानाचा हक्क अखंडपणे बजावला. आता 2026 मध्ये बारामती विधानसभा मतदारसंघात महाराष्ट्राचे एक लाडके व लोकप्रिय नेते स्व. अजित पवार यांच्या दुर्दैवी, अपघाती निधनाच्या शोकात्म पार्श्वभूमीवर ही पोटनिवडणुक होत आहे.

या पोटनिवडणुकीसाठी बारामती येथे येऊन आतापर्यंतच्या प्रघातानुसार मतदान करण्याचे मी ठरवले होते. दुर्दैवाने माझी प्रकृती बिघडल्याने मला मुंबईत रुग्णालयात दाखल व्हावे लागले. डॉक्टरांनी मला उपचार आणि सक्तीची विश्रांती या कारणास्तव मुंबईबाहेर जाण्यास मनाई केली आहे. त्यामुळे अत्यंत नाईलाजास्तव मतदानाचा हक्क बजावण्यापासून मला वंचित रहावे लागत आहे, हे मी अत्यंत व्यथित आणि खेदपूर्ण अंत:करणाने सांगू इच्छितो. माझ्यावर अथक प्रेम व विश्वास असलेले बारामतीचे नागरिक, मतदार व कार्यकर्ते मला समजुन घेतील याची मी खात्री बाळगतो, असे शरद पवार यांनी म्हटले.

आमच्या पक्षाने (राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष — शरदचंद्र पवार) या पोटनिवडणुकीत श्रीमती सुनेत्रा अजित पवार यांना पाठिंबा जाहिर केला आहे. स्व. अजित पवार यांना ही एकप्रकारे आमच्या पक्षातर्फे श्रद्धांजलीच आहे. माझे बारामतीमधील सर्व मतदारांना आवाहन आहे की, त्यांनी श्रीमती सुनेत्रा अजित पवार यांना मतदान करून स्व. अजित पवार यांना श्रद्धांजली अर्पण करावी, असे शरद पवार म्हणाले. बारामतीमधील मतदार यांनी माझ्यावर प्रदीर्घ विश्वास ठेवलेला आहे. ते या आवाहनास प्रतिसाद देतील, असा विश्वास शरद पवारांनी व्यक्त केला.

मतदानासाठी प्रत्यक्ष न येता निवडणुक आयोगाच्या विविध पर्यायांचा देखील मी तपास केला व विचारणा केली. परंतु ते पर्याय उपलब्ध नसल्याचे राज्याच्या निवडणुक अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले. अखेर अतिशय व्यथित व जड अंत:करणाने मला मतदानापासून दूर राहण्याचा निर्णय करावा लागला. या पोटनिवडणुकीत श्रीमती सुनेत्रा अजित पवार यांना मतदान करावे, असे आवाहन शरद पवार यांनी बारामतीकरांना केले आहे.

## उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार एक सक्षम महिला म्हणून देशभरात नावारुपास येतील - भुजबळ



**बारामती** : सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसच्या अध्यक्षा तथा राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार या एक सक्षम महिला म्हणून देशभरात नावारुपास येतील, असा ठाम विश्वास राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी मंगळवारी व्यक्त केला. घराचा आधार हरवला. पण घर अजूनही हातात हात घेऊन उभे आहे. सुनेत्राताई अजितदादांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी रात्रंदिवस कष्ट करत आहेत. त्यामुळे आपल्याला ताईंसोबत खंबीरपणे उभे राहायचे आहे, असे ते म्हणालेत.

बारामती विधानसभेच्या पोटनिवडणुकीच्या प्रचाराचा आज शेवटचा दिवस आहे. महायुतीच्या उमेदवार सुनेत्रा पवार यांची आज बारामतीत सांगता सभा झाली. या सभेत बोलताना मंत्री छगन भुजबळ यांनी बारामतीकरांना सुनेत्रा पवारांना मोठ्या मताधिक्याने विजयी करण्याचे आाहन केले. ते म्हणाले, महायुती व महाविकास आघाडीतील पुढाऱ्यांनी क्षणाचाही विलंब न करता सुनेत्राताईंना पाठिंबा दिला. तसेच काँग्रेस अध्यक्षांनाही पाठिंबा देण्यास सांगितले. याविषयी सर्वांचे आभार. पण इतर उमेदवारांनीही सुनेत्रा पवारांना बिनशर्त पाठिंबा देण्याची गरज होती. कारण, घराचा आधार हरवला तरी घर अजूनही हातात हात घेऊन ठामपणे उबे आहे. बारामतीकरांना वाटेल, सुनेत्रा पवार निवडूनच येणार आहेत, आपल्या एका मताने काय फरक पडेल. पण असे चालणार नाही. आपल्यासाठी एकेक मत महत्त्वाचे आहे. सुनेत्रा पवार अजित पवारांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी रात्रंदिवस कष्ट करत आहेत. त्यामुळे आपल्याला ताईंसोबत खंबीरपणे उभे राहायचे आहे.

भुजबळ यांनी यावेळी सुनेत्रा पवार देशातील एक सक्षम महिला नेत्या म्हणून पुढे येतील असा ठाम विश्वासही व्यक्त केला. ते म्हणाले, देशात अनेक महिला मुख्यमंत्री झाल्या. उपमुख्यमंत्री झाल्या. राष्ट्रपती झाल्या. पंतप्रधान झाल्यात. त्यामुळे ताईंना तुम्ही केवळ राज्याच्या नाही, तर देशाच्या नेत्या म्हणून निवडून देणार आहात. त्यामुळे आपल्या सर्वांना मतदान करणे महत्त्वाचे आहे. सुनेत्रा पवार एक सक्षम महिला म्हणून देशात नावारुपास येतील यात शंका नाही. त्यांच्यात जनतेचे दु:ख समजून घेण्याची संवेदनशीलता आहे. त्यांना बारामतीला देशाच्या नकाशावर एका नव्या उंचीवर न्यायचे आहे.

# CSMT स्थानकावर दोन लोकल आमनेसामने:मोठा अनर्थ टळला



**मुंबई** : छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे मंगळवारी दुपारी ३ वाजेच्या सुमारास दोन लोकल एकाच ट्रॅकवर आमनेसामने आल्याची अत्यंत गंभीर घटना घडली असून, याप्रकरणी मध्य रेल्वे प्रशासनाने तत्काळ पावले उचलत संबंधित स्टेशन मास्तरला निलंबित केले आहे. सुदैवाने या घटनेत मोठा अनर्थ टळला असला, तरी प्रवाशांच्या सुरक्षेशी तडजोड आणि संभाव्य धोक्याचे गांभीर्य लक्षात घेऊन रेल्वे प्रशासनाकडून ही मोठी कारवाई करण्यात आली आहे.

बदलापूरहून येणारी फास्ट लोकल नियोजित प्लॅटफॉर्म क्रमांक ४ ऐवजी अचानक ५ कडे वळवण्यात आली, जिथे आधीच एक लोकल उभी होती. मात्र समोर दुसरी गाडी असल्याचे लक्षात येताच मोटरमनने दाखवलेल्या प्रसंगावधानामुळे आणि तातडीने लावलेल्या ब्रेक्समुळे दोन्ही गाड्यांमध्ये अवघ्या १२० मीटरचे अंतर राहिले आणि मोठी दुर्घटना टळली. रेल्वेच्या सिग्नल आणि ट्रॅक व्यवस्थापनातील संभाव्य त्रुटीमुळे घडलेल्या या गंभीर घटनेची तातडीने दखल घेत, प्रशासनाने जबाबदारी निश्चित करत संबंधित स्टेशन मास्तरला निलंबित केले आहे.

तज्ज्ञांच्या मते, दोन गाड्या एकाच ट्रॅकवर येण्याची घटना अत्यंत दुर्मिळ असून, सिग्नल प्रणाली किंवा ट्रॅक कंट्रोल यंत्रणेत मोठा बिघाड झाल्यासच अशी परिस्थिती उद्भवू शकते. याच कारणामुळे रेल्वे प्रशासनाकडून या प्रकरणातील तांत्रिक त्रुटींचा सखोल तपास केला जात आहे. सीएसएमटी येथील ही घटना रेल्वेच्या सुरक्षितता यंत्रणेवर मोठे प्रश्नचिन्ह उपस्थित करणारी ठरली आहे. दुसरीकडे, रेल्वेच्या कामकाजात बुधवारी झालेला हा सलग तिसरा बिघाड ठरल्याने प्रवाशांचा संयम सुटला आहे. पहाटे खर्डी येथील ब्लॉकची वाढलेली वेळ आणि त्यानंतर डोंबिवलीत पूर्वसूचनेशिवाय घेतलेला ब्लॉक यामुळे लोकलचे वेळापत्रक आधीच कोलमडले होते. त्यातच सीएसएमटी येथील या घटनेची भर पडल्याने सेवा पूर्णपणे विस्कळीत झाली. या गोंधळामुळे स्थानकांवर प्रवाशांची प्रचंड गर्दी होऊन त्यांना मनस्ताप सहन करावा लागला असून, रेल्वे प्रशासनाच्या ढिसाळ नियोजनावर प्रवाशांकडून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २२ एप्रिल २०२६

## राज्य कर्मचाऱ्यांचे निवृत्तीचे वय-६० वर्ष करावे



**जालना (प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे) :** केंद्र शासना प्रमाणे, राज्य कर्मचाऱ्यांचे निवृत्तीचे वय ५८ ऐवजी ६०वर्षे करावे अशी मागणी मुक्ता संघटनेचे जिल्हा कोषाध्यक्ष प्रा. समाधान पवार यांनी केली आहे. राज्य कर्मचाऱ्यांसाठी विशेषता शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी १० -२०- ३०चा फॉर्मुला लागू करावा, तसेच निवृत्तीचे वय केंद्र शासनाप्रमाणे ,५८ येऊ जी ६० वर्षे करावे, तरच राज्यात खऱ्या अर्थाने समता प्रस्थापित होईल आज देशामध्ये २५ राज्यांमध्ये निवृत्ती चे वय ६० वर्षे आहे,परंतु महाराष्ट्र पुरोगामी राज्य असून सुद्धा राज्य कर्मचाऱ्यांचे येथे निवृत्तीचे वय ५८ वर्षे आहे ,ही चुकीची गोष्ट असून, केंद्र सरकार प्रमाणे ६० वर्षे निवृत्तीचे वय करावे, महाराष्ट्र सरकारनेही बदल स्वीकारावा, केंद्रात व राज्यात भाजपचे सरकार आहे, त्यांनी त्वरित हा निर्णय लागू करावा, अन्यथा राज्यात विद्रोह पेटेल राज्य कर्मचारी संपावर जातील, याची गंभीर दखल घेऊन राज्य सरकारने वरील निर्णय लागू करावा, अशी मागणी मुक्ता संघटनेचे जालना जिल्हा कोषाध्यक्ष समाधान पवार यांनी एका पत्रान्वये केलेली आहे.

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स अँण्ड प्रिंटर्स

डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.

मो. 8087880274, 8956362639, 9270446603, 9405109103

डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशनसचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274

Email - sahilcomputer05@gmail.com

## उन्हाची तीव्रता वाढत असल्याने विनाकारण घराबाहेर पडू नये ; उष्माघात कक्ष स्थापन, डॉ. सकलेन शेख



**अतनूर (प्रा.सुधीर पचगल्ले) :** कडक उन्हाळा सुरू झाला असून, सूर्य आग ओकत आहे. दुपारी १२ वाजल्यावर तर सूर्य आग ओकत आहे. सतत पाणी प्यावे आणि विनाकारण घराबाहेर पडू नये, लहान मुले, गरोदर माता आणि वयोवृद्ध नागरिकांनी बाहेरगावी जाणे टाळावे, असे आवाहन प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ.सकलेन शेख यांनी केले आहे.सध्या उन्हाळ्याची चाहूल दिवसेंदिवस उष्माघातामुळे दिवसेंदिवस वाढ होत असल्या कारणामुळे प्राथमिक आरोग्य केंद्र अतनूर येथे २८ गाव, वाडी, तांडा, वस्तीतील तसेच ५ उपकेंद्रातील सर्व अधिकारी, कर्मचारी, बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, एनजीओ, सामाजिक संस्था, तज्ञ डॉक्टर्स मंडळी, आरोग्य सहाय्यक कर्मचारी सह इतरांची बैठक प्राथमिक आरोग्य केंद्राच्या सभागृहात मंगळवारी पार पडली. यावेळी विविध उष्णता निर्माण संदर्भातील तज्ज्ञ डॉक्टरांनी व तज्ज्ञांनी आपले विचार व्यक्त करताना सांगितले की, उष्णता वाढली असून उष्णतेमुळे अंगातून घामच घाम निघत असून शरीर त्राही त्राही होत आहे. तापमान ४० अंशाच्या पुढे गेले असून ग्रामस्थांनी विशेष म्हणजे गरोदर महिला, नवजात बालकांनी, वयोवृद्ध नागरिकांनी बाहेर गावी जाण्याचे टाळावे. जास्तीत जास्त पाणी प्यावे, तहान लागो अथवा न लागो पाणी थोड्याथोड्या वेळाने प्यावे, बाळांना सुती वस्त्र तसेच थंड हवेत ठेवावे. पाण्याची पट्टी अंगावर ठेवावी. उन्हात तर बाहेर फिरू नका जर आवश्यक असल्यास डोक्यावर टोपी, टॉवेल, रुमालचा व अंगावर सुती कपडे घालून सकाळी १० पर्यंत प्रवास करा किंवा फिरा मात्र दुपारी १२ नंतर फिरू नका. लस्सी, ताक, दही, सेवन करा, थकवा येत असेल, घाम जात असेल तर लिंबू सरबत, ओआरएसचे जास्तीत जास्त सेवन करावे, कामगारांनी व शेतकऱ्यांनी जे काही काम असेल तर ११ पर्यंत करा नंतर उन्हात काम करू नका किंवा बाहेर फिरण्याचे टाळा, शक्यतो सुती कॉटन कपड्याचा वापर करा, दुपारी थंड पाण्यानी आंघोळ करा, शीतपेय, ताक, नारळ पाणी, लस्सी, लिंबू पाण्याचा वापर करा. पशु, जनावरे आणि प्राणी तसेच नवजात बालक तसेच छोट्या बालकांना उन्हात, बंद खिडकी वाहनात बसवू नका, दुपारी अंगावर थंड पाण्याची पट्टी ठेवा, चक्कर किंवा मळमळ होत असेल तर डॉक्टरांचा सल्ला घ्या, ओआरएस पाजवा, जल ही जीवन आहे.जास्तीत जास्त थंड स्वच्छ पाणी प्यावे, विनाकारण भरउन्हात घराबाहेर पडू नका, दोन महिने सुती कपडे, डोक्यावर टोपी टॉवेल किंवा छत्रीचा वापर करा, भरपूर पाणी प्या, जोपर्यंत उन्हाची तीव्रता कमी जाणवत नाही तोपर्यंत नागरिकांनी घराबाहेर पडू नये, असे आवाहनही साई हास्पिटल प्रा.ली.चे संस्थापक अध्यक्ष डॉ.माधव वीरप्पा चंबुले व जनरल हॉस्पिटलच्या संचालिका सौ.मीरा माधव चंबुले, डॉ.सुशिलकुमार चंबुले, डॉ.सौ.पुजा सुशीलकुमार चंबुले यांनी केले आहे.वैद्यकीय अधिकारी डॉ. सकलेन शेख, वैद्यकीय अधिकारी डॉ.भक्ती कोल्हे, आरोग्य मित्र बालासाहेब गोविंदराव शिंदे अतनूरकर, ग्राहक जनजागरण व मार्गदर्शन संस्थांचे संस्थापक राज्याध्यक्ष बी.जी.शिंदे अतनूरकर, जिजामाता महिला मंडळ अतनूरच्या अध्यक्षा सौ.संध्या बाळासाहेब शिंदे अतनूरकर, वसुंधरा महिला मंडळाच्या अध्यक्षा सौ.रुक्मीणबाई पांडुरंग सोमवंशी, ग्राहक संरक्षण परिषदेचे शासन नियुक्त अशासकीय सदस्य बालासाहेब गोविंदराव शिंदे अतनूरकर, ग्राहक पंचायत महाराष्ट्र राज्य व ग्राहक समिती महाराष्ट्र राज्यांचे प्रदेश संघटक बी.जी.शिंदे, आरोग्य सहाय्यक कर्मचारी सलमान शेख आरोग्य सहाय्यक बालाजी सोनटक्के, औषध निर्माता गजानन धोंडोरे, जनरल नर्सिंग मिडवाइफरी दिपा मांगीलवार, जनरल नर्सिंग लक्ष्मी मेटे, जनरल नर्सिंग आरोग्य सहाय्यक चंदा सुळकेकर, प्रयोगशाळा तंत्रज्ञ महेश बिरादार, आरोग्य सहाय्यक महिला स्मिता म्हात्रे, रूग्ण वाहन चालक इस्माईल ताजोद्दीन मुजेवार, परिचारक सुनिल पिंगनवार, परिचारक पृथ्वीराज चव्हाण, आरोग्य कर्मचारी, आणि रुग्णालयातील नातेवाईक व अतनूर प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत २८ गाव, ५ उपकेंद्रातील आरोग्य सहाय्यक, आरोग्य सहाय्यिका, आरोग्य कर्मचारी प्रतिनिधी उपस्थित होते.

## मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्ष रुग्ण, रुग्णालये आणि शासन यांना एकत्र आणणारे व्यासपीठ-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**बीड (भगवंत पाळवदे) :** मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षाकरिता विकसित करण्यात आलेल्या ऑनलाईन प्रणालीचे आज लोकार्पण करण्यात आले. यामध्ये राज्यामध्ये कार्यरत असणाऱ्या आरोग्यविषयक विविध योजनांचे एकत्रिकरण करण्यात येणार असून त्यासाठी प्रथमच राज्यात वॉर रूम स्थापन केली जाणार आहे. त्यामुळे मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्ष केवळ आर्थिक मदतीचा स्रोत न राहता, रुग्ण, रुग्णालये आणि शासन यांना एकत्र आणणारे प्रभावी व्यासपीठ ठरत असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.सह्याद्री अतिथीगृह येथे मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाच्या कामकाजाचा आढावा व मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाकरिता विकसित करण्यात आलेल्या ऑनलाईन प्रणालीचे उद्घाटन तसेच राज्यामध्ये कार्यरत आरोग्यविषयक योजनांचे एकत्रिकरण करण्यात येऊन वॉर रूम स्थापन करण्यासंदर्भात सादरीकरण करण्यात आले. त्यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाचे कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक यांनी सादरीकरणाव्दारे नवीन ऑनलाईन प्रणालीची माहिती दिली.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, कर्करोगाच्या उपचारासाठी वापरली जाणारी इम्युनो थेरेपी अतिशय खर्चिक असते. तिचा खर्च सामान्यांच्या आवाक्याबाहेर असतो. या थेरेपीचे एक इंजेक्शन साधारणतः दोन लाख रुपयांच्या घरात असून, उपचाराचा एकूण खर्च जवळपास आठ लाख रुपये असतो. या उपचार पद्धतीचा लाभ राज्यातील गरजू रुग्णांना देण्यासाठी नियोजन करावे .आरोग्य योजनाचा लाभ गरजूना मिळावा, परंतु दुहेरी लाभ टाळल्यास त्याचा लाभ खऱ्या गरजुना जास्त प्रमाणात देता येईल. हा उपक्रम चांगला असून याद्वारे खऱ्या गरजुना मदत करता येईल, त्याचप्रमाणे दुहेरी लाभ देण्याचे प्रकारही टाळता येतील.नवीन वेबसाईटची वैशिष्टेअर्ज स्थितीची ट्रेकिंगः यापुढे रूग्णांना अर्जाची माहिती त्यांच्या मोबाईलवर एसएमएस, लिंकद्वारे रिअल टाईम मिळणार. टप्प्या-टप्प्याने निधी वितरणः अर्जाच्या मंजुरीनंतर 30 टक्के रक्कम तात्काळ, उर्वरित 70 टक्के रक्कम अंतिम मंजुरीनंतर वर्ग केली जाणार.रिअल-टाइम वॉर रूम मॉनिटरिंग : मंत्रालय स्तरावर वॉर रूमद्वारे सतत देखरेख, निर्णय प्रक्रियेत गती.तात्काळ मंजुरी (कार्यालयीन आठ तासांत मंजुरी) : उपचारासाठी लागणाऱ्या आर्थिक सहाय्याची मंजुरी केवळ कार्यालयीन आठ तासांत दिली जाते.पूर्णपणे पेपरलेस प्रक्रिया : कागदपत्रांची देवाणघेवाण किंवा कार्यालयीन धावपळीशिवाय डिजिटल पद्धतीने संपूर्ण प्रक्रिया पूर्ण.रुग्णालयामार्फत थेट ऑनलाईन अर्ज : रुग्णांना स्वतः अर्ज करण्याची गरज नाही रुग्णालयातूनच अर्ज सादर.कागदपत्रांची ऑनलाईन पडताळणी : आधार, उत्पन्न प्रमाणपत्र, शिधापत्रिका इ. तात्काळ डिजिटल पडताळणी.थेट लाभ हस्तांतरण (डीबीटी) : मंजूर निधी थेट रुग्णालयाच्या खात्यात जमा पारदर्शकता वाढणार.3 हजारापेक्षा अधिक रुग्णालयांचे जाळे : राज्यातील सरकारी व खाजगी मिळून 3,000+ रुग्णालयांचा समावेश.हेल्पलाईन व डिजिटल मार्गदर्शन : टोल-फ्री 1800 123 2211 व वाट्अॅप द्वारे मार्गदर्शन.मोबाईल अॅपद्वारे रुग्णालय शोधता येणार : योजनेमधील जवळील रुग्णालय, रक्तपेढी, रुग्णवाहिका सहज शोधण्याची सुविधा. *एनजीओ व सीएसआर भागीदारी मॉडेल * स्वयंसेवी संस्था व कॉर्पोरेट सीएसआर निधीद्वारे अधिक आर्थिक सहाय्य उपलब्ध.त्रिपक्षीय करार प्रणाली : रुग्णालय + सीएसआर संस्था + सीएमआरएफ यांच्यात विशिष्ट आजारासाठी करार खर्चाचा संयुक्त भार.बेड मॅनेजमेंट व संसाधन पारदर्शकता : * धर्मादाय रुग्णालयांतील बेड उपलब्धता रिअल-टाइम पाहण्याची सुविधा.मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाचे कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक यांनी मुख्यमंत्री आरोग्य शिबिर व्यवस्थापन ऑनलाईन प्रणालीमध्ये आरोग्य शिबिरे घेतली जातात असे सांगितले. मुख्यमंत्री आरोग्य शिबिरामधील हृदय उपचाराशी संबंधीत 'स्टेमि ईसीजी' या वैद्यकीय तपासणीला 'मुख्यमंत्री हृदय संजीवनी' असे नाव देण्यात यावे असे सुचविले. रुग्णांना तात्काळ आणि सुलभ मार्गदर्शन मिळावे यासाठी 'रुग्ण मित्र' ही 24x7 टोल-फ्री हेल्पलाईन (1800 123 2211) सुरू करण्यात आली आहे. या सेवेद्वारे रुग्णांना डिजिटल लिंक मिळते, ज्यातून त्यांच्या परिसरातील मान्यताप्राप्त रुग्णालये, रुग्णवाहिका सेवा आणि रक्तपेढ्यांची माहिती एका ठिकाणी उपलब्ध होते. त्यामुळे उपचारासाठी आवश्यक माहिती मिळविण्याची प्रक्रिया अधिक सोपी आणि जलद झाली आहे.लोकसहभाग वाढविण्यासाठी स्वयंसेवी संस्थांसाठी स्वतंत्र ऑनलाईन पोर्टल विकसित करण्यात आले आहे. या माध्यमातून संस्था नोंदणी करून शासनासोबत भागीदारी करू शकतात. तसेच मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष, कॉर्पोरेट सामाजिक उत्तरदायित्व (सीएसआर) संस्था आणि रुग्णालय यांच्यातील त्रिपक्षीय करारामुळे महागड्या उपचारांसाठी निधी उपलब्ध करून देण्याची प्रक्रिया अधिक सक्षम झाली आहे. विशेषतः कर्करोगासारख्या गंभीर आजारांसाठी हा उपक्रम मोठा दिलासा देणारा ठरत आहे.

यावेळी बृहन्मुंबई महापालिकेच्या आयुक्त अश्विनी भिडे,मित्रा संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण परदेशी, विधि व न्याय विभागाचे प्रधान सचिव दिलीप घुमरे, सार्वजनिक आरोग्य विभागाचे प्रधान सचिव, डॉ.निपुण विनायक, सार्वजनिक आरोग्य विभागाचे सचिव - 2 ई रविंद्रन, महिला व बालविकास सचिव अनुप कुमार यादव, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाचे आयुक्त अनिल भंडारी, धर्मादाय आयुक्त अमोघ कलोती, महात्मा फुले जन आरोग्य योजनेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अण्णासाहेब चव्हाण आणि संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते तसेच दूरदृश्य प्रणालीद्वारे जिल्हाधिकारी उपस्थित होते.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २२ एप्रिल २०२६


## खुलताबादमध्ये आ. प्रशांत बंब यांनी विविध समस्या सोडविण्याचे दिले आश्वासन



**खुलताबाद (सनिराम गावंडे)** : गंगापुर - खुलताबाद मतदार संघाचे आमदार प्रशांत बंब यांनी खुलताबाद तालुक्यामध्ये तहसील कार्यालयात समस्या निवारण करण्याकरिता दि २० एप्रिल २०२६ रोजी सकाळी १०:३० ते दुपारी ४:०० वाजे पर्यंत शिबिर आयोजीत केले होते त्यात नागरिकांनी त्यांची समस्या तक्रार, अर्ज लेखी स्वरुपात तहसिल कार्यालयात जमा करण्यात आले.मतदार संघातील नागरिकांना जीवनात रस्ते पाणी शिक्षण आरोग्य यांसारख्या विविध शासकीय तसेच स्थानिक अडचणींना सामोरे जावे लागते या समस्यातील लोकप्रतिनिधीपर्यंत पोहोचवाव्यात आणि त्यावर त्वरित व प्रभावी योग्य निवारण करण्यात आले होते शिबिरात सहभागी होणाऱ्या नागरिकांनी आपले अर्ज लेखी स्वरूपात तहसिलदार यांच्या समक्ष देण्यात आले या सर्व प्रश्नांचे उत्तर एक महिन्यात निकाली काढण्यात येतील असे आश्वासन प्रशांत बंब यांनी दिले या शिबिरासाठी जास्तीत जास्त नागरिकांनी सहभाग घेतला होता.

## पठाण जाहेदखान साहेबखान यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त



**छत्रपती संभाजीनगर** : मनपा प्राथमिक व माध्यमिक विद्यालय चिकलठाणा येथील माध्यमिक शिक्षक पठाण जाहेदखान यांना नाशिक येथील swift and lift कंपनीतर्फे राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाल्याबद्दल शाळेचे मुख्याध्यापक संजय मडके यांच्या हस्ते शाल व पुष्पहार घालून सत्कार करण्यात आला. सदर सत्कार समारंभ निमित्त सर्जेराव वाघ, वसंत राठोड, संदीप चव्हाण, सूर्यवंशी, बेबी माळोदे अरुणा फुलंब्रीकर मनिषा शिंदे, अनुजा भिंगोले, अर्चना भारद्वाज, विद्या सासवडे, मंगल तारो हे सर्व हजर होते. सर्व उपस्थित यांनी श्री पठाण सर त्यांचे अभिनंदन केले व पठाण सर यांनी सर्वांचे आभार मानले.

## इकरा पब्लिक स्कूलचा 'समर होमवर्क बुक' उपक्रम; विस्तार अधिकाऱ्यांकडून कौतुक"



**जळगाव** : उन्हाळ्याच्या सुट्टीत विद्यार्थ्यांची अभ्यासाशी असलेली नाळ तुटू नये आणि त्यांच्या वेळेचा सदुपयोग व्हावा, या उद्देशाने इकरा पब्लिक स्कूल, मोहाडीतर्फे एक अभिनव उपक्रम राबविण्यात आला आहे.या उपक्रमांतर्गत इयत्ता पाचवी ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी सर्व विषयांचा समावेश असलेले विशेष 'समर वेकेशन होमवर्क बुक' तयार करण्यात आले असून,त्याचे नुकतेच मान्यवरांच्या हस्ते वितरण करण्यात आले.या विशेष कार्यक्रमासाठी शिक्षण विस्तार अधिकारी मा.शेख अलाउद्दीन सर यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना या होमवर्क बुक्सचे वाटप करण्यात आले.पारंपारिक पद्धतीने सुट्ट्यांचा गृहपाठ देण्याऐवजी, शाळेने सर्व विषयांचा अभ्यासक्रम संकलित करून त्याला एका दर्जेदार छापील पुस्तकाचे रूप दिले आहे, जेणेकरून मुले सुट्टीत मनोरंजक पद्धतीने शिक्षणाशी जोडलेली राहतील. या कल्पक उपक्रमाचे कौतुक करताना शेख अलाउद्दीन सर म्हणाले की, ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची ओढ कायम राखण्यासाठी हा प्रयत्न अत्यंत कौतुकास्पद असून शाळेने घेतलेली ही मेहनत विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी नक्कीच फायदेशीर ठरेल. तसेच प्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ डॉ.करीम सालार यांनी देखील या उपक्रमाची प्रशंसा करत सुट्ट्यांचा योग्य वापर करण्यासाठी ही 'समर वेकेशन बुक' अत्यंत प्रभावी माध्यम असल्याचे सांगितले. त्यांनी या यशस्वी आयोजनाबद्दल शाळा व्यवस्थापन आणि शिक्षकांचे विशेष अभिनंदन केले आहे. इकरा पब्लिक स्कूलच्या या शैक्षणिक प्रयोगाचे सध्या मोहाडी परिसरात सर्वत्र कौतुक होत आहे.


### जाहिरात दर

१. पूर्ण पान (मल्टीकलर) ५०००/-
२. अर्धे पान (मल्टीकलर) ३०००/-
३. पाव पान (मल्टीकलर) २०००/-
४. शुभेच्छा जाहिरात ६००/-



### १२ वी सायन्स व B.Sc. पास विद्यार्थ्यांसाठी

शासन मान्यताप्राप्त जॉबगॅरंटी कोर्सेस

DMLT
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स

PGDMLT
कालावधी दिड वर्ष (३सेमिस्टर)
पात्रता : B.Sc.
(Microbiology, Chemistry, Botany, Zoology, Biochemistry, MLT, CLS)

X-RAY
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

C.T.SCAN
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

E.C.G.
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

O.T. TECHNICIAN
कालावधी २ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

PG RADIOLOGY
कालावधी दिड वर्ष (३सेमिस्टर)
पात्रता : B.Sc. Physics

रेडिओलॉजी
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

फिजिओथेरपी
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

ऑप्थोमेट्री
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

9405109103 | 8830838903

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित
मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.



बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (MPW), आरोग्य निरीक्षक, आरोग्य पर्यवेक्षक, स्वच्छता निरीक्षक या पदासाठी आवश्यक असलेला शासनमान्य
Sanitary Health Inspector
सॅनेटरी हेल्थ इन्स्पेक्टर
या कोर्ससाठी प्रवेश चालु आहेत

बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ,पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)
9405109103
8830838903

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २२ एप्रिल २०२६

# धाकटा

मीच सर्वांना धाकटा
आमच्या घरी
सत्ता गाजवितात
माझ्यावर सारी

आई मला म्हणते
तू आहेस लहान
बाहेर गेलास तर
पिनगाळीण कान

बाबा व दादा घालतात
कडक इस्त्रीचा फुल पॅन्ट
मी लहान असल्याने
घालावी लागते हॉफ पॅन्ट

आजी आजोबा म्हणतात
लहानांनी बोलू नये खोटं
अन्यथा देवबाप्पा
मोडतात हातांची बोटं

क्रिकेट खेळायला दादा
मित्रांसोबत मैदानी जातो
मी हट्ट केला तर म्हणतो
उद्या तुला नक्की नेतो

देवबाप्पा मला
करायचा होता ना नकटा !
असा कसा रे तू
का रे केलास धाकटा ?



- रवींद्र चालीकवार
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.9011559106

# नको अशी माणसं!

जगताना अनेक,माणसं मी पाहिले.
संकटकाळी सदा, खूप दूर राहिले.

संकटात सोडून, सारेच पळतात.
सुख येताच मात्र,लगेच जुळतात.

नको अशी माणसं! सोबत ठेवायला.
जे येतात नेहमी, सुखात जेवायला.

माणूस स्वत:शीच, असे का तो वागतो.
नको त्या गोष्टीसाठी, रात्र रात्र जागतो.

माणसाचे वागणे, आहे खूप गजब.
वागताना नेहमी, वागतोय अजब.

काही काही माणसं, कठोर वागतात.
अडचण काळात, पुरावा मागतात.

सतत तू माणसा, स्वार्थाचे गीत गातो.
मदत मागताच, दूर पळून जातो.



नागेश बोंतेवाड,
छत्रपती संभाजीनगर




# वसुंधरेची आर्त हाक : विकासाच्या वाटेवर शाश्वतपणाचा ध्यास

**द**रवर्षी 22 एप्रिल हा दिवस 'जागतिक वसुंधरा दिन' म्हणून साजरा केला जातो. हा केवळ दिनविशेष नसून पृथ्वीवरील जीवनाच्या अस्तित्वाशी निगडित असलेली एक गंभीर जाणीव आहे. मानवाने विज्ञान-तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे अभूतपूर्व विकास साधला असला तरी या विकासाच्या बदल्यात पृथ्वीच्या संसाधनांवर प्रचंड ताण निर्माण झाला आहे. हवामान बदल, प्रदूषण, जंगलतोड, जैवविविधतेचा ऱ्हास, जलसंकट यांसारख्या समस्यांनी आज संपूर्ण जगाला वेढले आहे. अशा परिस्थितीत वसुंधरा दिन हा केवळ उत्सव म्हणून नव्हे, तर आत्मपरीक्षणाचा दिवस म्हणून पाहणे आवश्यक आहे. पृथ्वी ही आपली केवळ राहण्याची जागा नसून ती आपली 'आई' आहे, जी आपल्याला अन्न, पाणी, हवा आणि जीवन देत असते. त्यामुळे तिच्या रक्षणाची जबाबदारी ही प्रत्येकाची नैतिक कर्तव्य आहे.वसुंधरा दिनाची सुरुवात 1970 साली झाली. पर्यावरणाच्या रक्षणासाठी लोकांमध्ये जागृती निर्माण करण्याचा हा एक मोठा जागतिक उपक्रम ठरला. सुरुवातीला काही देशांपुरता मर्यादित असलेला हा दिवस आज जगभरातील जवळपास सर्व देशांमध्ये साजरा केला जातो. या दिवसाच्या निमित्ताने पर्यावरण संवर्धनाचे विविध कार्यक्रम, मोहिमा, जनजागृती उपक्रम राबवले जातात. परंतु केवळ एक दिवस साजरा करून पर्यावरण वाचणार नाही, तर हा विचार आपल्या दैनंदिन जीवनात रुजवणे गरजेचे आहे.आजच्या घडीला पर्यावरणीय संकटाचे स्वरूप अत्यंत भीषण झाले आहे. औद्योगिकीकरण, शहरीकरण आणि वाढती लोकसंख्या यामुळे नैसर्गिक संसाधनांचा अतिरेकाने वापर होत आहे. जंगलांची मोठ्या प्रमाणात तोड केली जात आहे, ज्यामुळे वन्यजीवांचे अधिवास नष्ट होत आहेत. नद्या, तलाव आणि समुद्र प्रदूषणाने ग्रासले आहेत. हवेत विषारी वायूंचे प्रमाण वाढले आहे. या सर्व घटकांमुळे पृथ्वीचे तापमान वाढत आहे, ज्याला 'जागतिक तापमानवाढ' असे म्हणतात. या तापमानवाढीमुळे हिमनद्या वितळत आहेत, समुद्राची पातळी वाढत आहे आणि नैसर्गिक आपत्तींचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे मानवी जीवनच धोक्यात आले आहे.हवामान बदल हा आजच्या काळातील सर्वात गंभीर प्रश्न आहे. पावसाचे चक्र विस्कळीत झाले आहे. काही ठिकाणी अतिवृष्टी होत आहे, तर काही ठिकाणी दुष्काळाचे संकट निर्माण होत आहे. कृषी क्षेत्रावर याचा मोठा परिणाम होत आहे. शेतकऱ्यांना पिकांचे नुकसान सहन करावे लागत आहे. अन्नसुरक्षेचा प्रश्न निर्माण होत आहे. त्यामुळे पर्यावरणीय समस्यांचा परिणाम केवळ निसर्गावरच नव्हे, तर मानवी जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रावर होत आहे.पर्यावरणाच्या ऱ्हासामागे मानवी हस्तक्षेप हा प्रमुख कारण आहे. 'विकास' या नावाखाली आपण निसर्गाचा विनाश करत आहोत. मोठमोठे प्रकल्प, धरणे, रस्ते, कारखाने यासाठी जंगलांची तोड केली जाते. नद्या वळविल्या जातात. खनिज संपत्तीच्या उत्खननासाठी पर्वत उध्वस्त केले जातात. या सर्व प्रक्रियेमुळे पर्यावरणाचा समतोल बिघडतो. निसर्गाच्या या असंतुलनाचा परिणाम शेवटी मानवावरच होतो. त्यामुळे विकास आणि पर्यावरण यामध्ये समतोल साधणे अत्यंत आवश्यक आहे.'शाश्वत विकास' ही संकल्पना याच पार्श्वभूमीवर पुढे आली आहे. शाश्वत विकास म्हणजे असा विकास, जो वर्तमान पिढीच्या गरजा पूर्ण करताना भविष्यातील पिढ्यांच्या गरजांवर परिणाम करत नाही. म्हणजेच, नैसर्गिक संसाधनांचा वापर करताना त्यांचे संवर्धन आणि पुनर्निर्मिती यांचा विचार करणे आवश्यक आहे. ऊर्जा, पाणी, जमीन यांचा वापर मर्यादित आणि योग्य पद्धतीने करणे गरजेचे आहे. पर्यावरणपूरक तंत्रज्ञानाचा वापर, नवीकरणीय ऊर्जेचा अवलंब, कचऱ्याचे पुनर्वापर यांसारख्या उपाययोजना यासाठी महत्त्वाच्या आहेत.जैवविविधता ही पृथ्वीवरील जीवनाचा पाया आहे. विविध प्रकारचे वनस्पती, प्राणी, सूक्ष्मजीव यामुळे पर्यावरणाचा समतोल राखला जातो. परंतु मानवी क्रियांमुळे जैवविविधतेचा ऱ्हास होत आहे. अनेक प्रजाती नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. यामुळे पर्यावरणीय संतुलन बिघडत आहे. त्यामुळे जैवविविधतेचे संरक्षण करणे अत्यंत आवश्यक आहे. यासाठी जंगलांचे संवर्धन, वन्यजीव संरक्षण, नैसर्गिक अधिवासांचे जतन यावर भर देणे गरजेचे आहे.जलसंकट ही आणखी एक गंभीर समस्या आहे. पाणी हे जीवनासाठी अत्यावश्यक आहे. परंतु आज अनेक भागांमध्ये पाण्याची टंचाई निर्माण झाली आहे. भूजलाचा अतिरेकाने वापर, पावसाच्या पाण्याचा अपुरा साठवण, नद्यांचे प्रदूषण यामुळे जलस्त्रोत आटत आहेत. त्यामुळे पाण्याचे संवर्धन करणे अत्यंत आवश्यक आहे. पावसाचे पाणी साठवणे, पाण्याचा योग्य वापर, जलप्रदूषण रोखणे यांसारख्या उपाययोजना करणे गरजेचे आहे.कचरा व्यवस्थापन हा देखील पर्यावरण संवर्धनाचा एक महत्त्वाचा भाग आहे. प्लास्टिकचा वाढता वापर हा पर्यावरणासाठी मोठा धोका ठरला आहे. प्लास्टिक विघटनास खूप वेळ लागतो, त्यामुळे ते जमिनीवर, पाण्यात साचून राहते आणि प्रदूषण वाढवते. त्यामुळे प्लास्टिकचा वापर कमी करणे, पुनर्वापर करणे आणि पर्यावरणपूरक पर्यायांचा अवलंब करणे आवश्यक आहे. 'कमी करा, पुनर्वापर करा आणि पुनर्चक्रण करा' हा मंत्र अंगीकारणे गरजेचे आहे.पर्यावरण संवर्धनात शिक्षणाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. पर्यावरणाविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी शिक्षण प्रणालीत पर्यावरण शिक्षणाचा समावेश करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांना लहानपणापासूनच पर्यावरणाचे महत्त्व पटवून देणे गरजेचे आहे. तसेच समाजातील प्रत्येक घटकाने पर्यावरण संरक्षणाची जबाबदारी स्वीकारणे आवश्यक आहे.शासन आणि धोरणे यांचीही पर्यावरण संवर्धनात महत्त्वाची भूमिका आहे. पर्यावरणपूरक धोरणे राबवणे, प्रदूषण नियंत्रणाचे नियम कडक करणे, नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण करणे यासाठी शासनाने प्रभावी पावले उचलणे आवश्यक आहे. परंतु केवळ शासनाच्या प्रयत्नांवर अवलंबून राहून चालणार नाही, तर प्रत्येक नागरिकानेही आपल्या स्तरावर प्रयत्न करणे गरजेचे आहे.आजच्या काळात तंत्रज्ञानाचा योग्य वापर करून पर्यावरण संवर्धन शक्य आहे. सौर ऊर्जा, वारा ऊर्जा, जल ऊर्जा यांसारख्या नवीकरणीय ऊर्जेचा वापर वाढवणे गरजेचे आहे. ऊर्जा कार्यक्षम उपकरणांचा वापर, हरित इमारतींची उभारणी, स्मार्ट शहरांची संकल्पना यामुळे पर्यावरणावरचा ताण कमी होऊ शकतो.वसुंधरा दिनाच्या निमित्ताने आपण प्रत्येकाने काही ठोस संकल्प करणे आवश्यक आहे. झाडे लावणे, पाणी वाचवणे, कचरा कमी करणे, पर्यावरणपूरक जीवनशैली स्वीकारणे यांसारख्या लहान उपाययोजना देखील मोठा फरक घडवू शकतात. पर्यावरण संवर्धन ही केवळ जबाबदारी नसून ती आपल्या अस्तित्वाची गरज आहे.समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून पाहिले तर पर्यावरणीय समस्या या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय घटकांशी निगडित आहेत. विकासाच्या प्रक्रियेत निर्माण होणारी विषमता, संसाधनांचे असमान वितरण, गरिबी, लोकसंख्येचा दबाव यामुळे पर्यावरणावर ताण वाढतो. त्यामुळे पर्यावरण संवर्धनासाठी समग्र दृष्टिकोन आवश्यक आहे, ज्यामध्ये सामाजिक न्याय, आर्थिक विकास आणि पर्यावरण संरक्षण यांचा समतोल साधला जाईल.शेवटी, वसुंधरा दिन हा आपल्याला एक महत्त्वाचा संदेश देतो की, पृथ्वी ही आपली मालमत्ता नसून आपण तिचे केवळ पालक आहोत. पुढील पिढ्यांसाठी ही पृथ्वी सुरक्षित आणि समृद्ध ठेवणे ही आपली जबाबदारी आहे. जर आपण आज योग्य पावले उचलली नाहीत, तर भविष्यातील पिढ्यांना गंभीर परिणामांना सामोरे जावे लागेल. त्यामुळे आता वेळ आली आहे, की आपण विकासाच्या नव्या वाटा शोधू, ज्या पर्यावरणपूरक आणि शाश्वत असतील. वसुंधरेच्या संरक्षणासाठी प्रत्येकाने आपले योगदान दिले, तरच पृथ्वीवरील जीवनाचा प्रवाह अखंडित राहील.



डॉ. राजेंद्र बगाटे,
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत) bagate.rajendra५@gmail.com